शासकीय वाहन-चालकांना देण्यात येणा-या अतिकालिक भत्त्यात वाढ.

-3-

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग,
शासन निर्णय क्रमांक :- जीसीएस-१३८०/सीआर-११११/एसईआर-९,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक :- २६ एप्रिल, १९८२.

## शासन निर्णय

शासनाचे विविध विभाग व त्याखालील निरनिराळी कार्यालये यांतील एखाद्या वाहन चालकाने विहित ९ तासांच्या कामाच्या वेळेपेक्षा जास्त वेळ काम केल्यास सध्या त्यांना गुणवत्तेनुसार शासनाच्या संमतीने खालील दराने अतिकालिक भत्ता मंजूर केला जातो.

[१] कामाच्या दिवशी ९ तासापेक्षा जास्त काम केल्यास [भोजन समय धरून] दर तासाला रू.१ [रू. एक]
[२] रविवार व इतर सुट्टीच्या दिवशी काम केल्यास दर तासाला ५० पैसे [पन्नास पैसे]

[अर्धा तास किंवा जास्त काम केल्यास तो पूर्ण तास धरण्यांत येतो]

२. वरील दर हे फार पूर्वी मंजूर झाले असल्यामुळे त्यांत वाढ करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. शासन आता असे आदेश देत आहे की, ज्या व्यक्तिगत प्रकरणांत शासकीय वाहन चालकाना वेगवेगळ्या मंत्रालयीन विभागानी काढलेल्या आदेशानुसार आतांपर्यन्त परिच्छेद १ मध्ये दर्शविलेल्या दराने अतिकालिक भत्ता मंजूर केला आहे त्या भत्त्याचे सुधारित दर व त्यासंबंधीच्या अटी दिनांक १ एप्रिल १९८२ पासून खालीलप्रमाणे राहतील :-

[१] कामाच्या दिवशी ९ तासापेक्षा जास्त काम केल्यास [भोजनसमय धरून] आणि रविवार व इतर सुट्टीच्या दिवशी सुध्दा काम केल्यास दर तासाला रू. २ [दोन] [अर्धा तास किंवा जास्त काम केल्यास तो पूर्ण तास धरण्यात येईल]
[२] वाहन चालक दौ-यावर असताना कामाच्या नियमित वेळेपेक्षा जास्त केलेल्या कामाबद्दल अतिकालिक भत्ता मंजूर करताना फक्त ज्या कालखंडात वाहन चालकाने प्रत्यक्ष गाडी चालविण्याचे काम केले असेल [Steering duty ]तेवढाच कर्तव्यकाळ लक्षात घेण्यात येईल.
[३] वाहन चालकास एका महिन्यांत मिळणारी अतिकालिक भत्त्याची एकूण रक्कम त्याच्या एकूण पगाराच्या [ Salary ] ५० टक्के पेक्षा जास्त होणार नाही.

३. वाहन चालकांना अतिकालिक भत्ता मंजूर करण्याचे अधिकार सध्या शासनाकडे आहेत. हे अधिकार दुय्यम प्राधिका-यास प्रदान करून त्यांना देण्यात येणारा अतिकालिक भत्ता मंजूर करण्याची पध्दती सुलभ करण्याचा प्रश्नही शासनाच्या विचाराधीन होता. शासन आता असे आदेश देत आहे की, वाहन चालकांना वरील परिच्छेद २ मधील सुधारीत दरांप्रमाणे व त्यांतील अटींच्या अधीन राहून, अतिकालिक भत्ता मंजूर करण्याचे अधिकार विभाग प्रमुखांना (Heads of Departments).

प्रदान करण्यात यावेत. मात्र विभाग प्रमुखांनी त्यांच्या हाताखाली काम करणा-या अथवा त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असलेल्या दुय्यम कार्यालयात काम करणा-या वाहन चालकानी मागील ६ महिन्याच्या कालावधीत दर महिन्यात सरासरी किमान १० दिवस अतिरिक्त काम केले आहे याची खातरजमा करावी. व नंतरच व्यक्तिगत प्रकरणांत अतिकालिक भत्ता मंजूर करावा.

४. या सुधारीत दरामुळे येणारा खर्च संबंधित विभागाच्या/कार्यालयाच्या त्या त्या लेखाशीर्षा खालील त्यांच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

त्र्यं.दे.पानसे,
शासनाचे उप सचिव.

प्रत रवाना --

महालेखापाल-१, महाराष्ट्र, मुंबई;
महालेखापाल-२, महाराष्ट्र, नागपूर,
लेखा व अधिदान अधिकारी, मुंबई,
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, नवी मुंबई,
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई/पुणे/नागपूर/औ
निवासी लेखा अधिकारी, मुंबई,
राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री, राज्यमंत्री आणि उप मंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
* प्रबंधक, उच्च न्यायालय [मूळ शाखा], मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय [अपील शाखा], मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
* प्रबंधक, लोकआयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
मंत्रालयाच्या सर्व विभागांखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
मंत्रालयीन सर्व विभाग,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
वित्त विभागातील सर्व कार्यासने,
निवड फाईल, वित्त विभाग, एसईआर ९.

पत्राद्वारे

१९८२ चा क्रमांक

माहिती व मार्गदर्शनाकरिता प्रत रवाना --

रच-२१५[८००० ५-४-८२]